महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

सर ज.जी.कला शाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग,मुंबई. ४०० ००१. दुरध्वनी क्र.२२६२०२३१/३२
Website:-www.doa.maharashtra.gov.in Email:-dirdoa.mum-mah@gov.in/directorateofart@gmail.com

क्रमांक:-डिओऐ-२०२२/दोन/ 1156 दिनांक:- 12 MAY 2022

प्रति,
अधिष्ठाता/प्राचार्य,
शासकीय,शासनमान्य अशासकीय कला संस्था,(महाराष्ट्र राज्य)

विषय:- शैक्षणिक सत्र २०२२-२३ (पदविका अभ्यासक्रम)
सत्रारंभ, दीर्घसुट्टया व सत्रसमाप्ती.

मंगळवार, दि.१३ जून, २०२२ पासून शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ चे पहिले सत्र सुरु होईल. या शैक्षणिक वर्षासाठी दीर्घसुट्टया, सत्रसमाप्ती आणि सत्राचे नियोजन खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

१) आठवडयातून कमीत कमी एकूण ३० तास शिकविण्यात यावे. दररोज ६ तास याप्रमाणे संस्था प्रत्येक आठवडयात चालू ठेवण्यात यावी.

२) महिन्याच्या प्रत्येक शनिवारी व रविवारी महाविद्यालये बंद राहतील. तसेच महाविद्यालयांची कार्यालये महिन्याच्या पहिल्या, तिस-या व पाचव्या शनिवारी कामकाजाकरिता चालू राहतील.

३) शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ मध्ये शैक्षणिक कामाचे दिवस १९२ पेक्षा कमी भरणार नाहीत याची संस्था चालकांनी खबरदारी घ्यावी.

४) प्रथम सत्रात ८९ व द्वितीय सत्रात १०३ याप्रमाणे कामाचे दिवस गृहीत धरावेत. अशा त-हेने एका शैक्षणिक वर्षाचे कामाचे दिवस १९२ गृहित धरुन त्यापैकी ३ स्थानिक सुट्टया देता येतील व अशारीतीने १८९ दिवस अंतिमत: पूर्ण करणे आवश्यक राहील.

५) या शैक्षणिक वर्षात सत्रारंभ, दीर्घसुट्टया आणि सत्रसमाप्ती खालीलप्रमाणे राहील.

| शैक्षणिक सत्र व दीर्घसुट्टया | आरंभ दिवस | समाप्ती दिवस | एकुण कामाचे दिवस |
|---|---|---|---|
| प्रथम सत्र | सोमवार,दि.१३ जून,२०२२ | ते शुक्रवार, दि.२१ ऑक्टोबर,२०२२ | ८९ |
| दिवाळी सुट्टी | शुक्रवार,दि.२४ ऑक्टोबर,२०२२ | ते सोमवार,दि.०७ नोव्हेंबर,२०२२ | -- |
| द्वितीय सत्र | बुधवार, दि.०९ नोव्हेंबर,२०२२ | ते शुक्रवार, दि.३१ मार्च,२०२३ | १०३ |
| | | **एकुण** | **१९२** |
| | | वजा स्थानिक सुट्टया | ३ |
| | | **एकुण कामाचे दिवस** | **१८९** |

६) वरीलप्रमाणे दि.३१.३.२०२३ पर्यंत शैक्षणिक वर्षाचे द्वितीय सत्र,शैक्षणिक कामकाज पूर्ण करण्यात यावे. तथापि, दि.१ एप्रिल ते ३० एप्रिल,२०२३ या कालावधीत महाविद्यालयाच्या अंतर्गत परीक्षेचे निकाल तयार करणे, शैक्षणिक वर्षाचे कामकाजाचे नियोजन करणे, उच्च कला परीक्षेचे कामकाज करणे, नवीन शैक्षणिक वर्षात शिकविण्यासाठी विषयाची पूर्वतयारी करण्याकरिता तसेच प्राचार्यांनी सोपविलेली इतर तद्नुषंगिक कामे करण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांसाठी महाविद्यालयाचे कार्यालय चालू ठेवण्यात यावे. व दि.१

मे,२०२३ रोजी महाराष्ट्र दिन साजरा करुन उन्हाळी सुट्टी अनुज्ञेय असलेल्या कर्मचा-यांना उन्हाळी सुट्टी दि.२ मे,२०२३ पासून पुढे अनुज्ञेय राहील. महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या सन २०२२ मधील सार्वजनिक सुट्टयांचा तक्ता व महिनानिहाय कामाचे दिवस दर्शविणारा तक्ता सोबत जोडला आहे.

२. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील १)प्रथम सत्र, २) दिवाळी सुट्टी, ३) द्वितीय सत्र, ४) उन्हाळी सुट्टीचा कालावधी वरीलप्रमाणे राहील. या चार बाबींव्यतिरिक्त इतर बाबींचे शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ मधील नियमन पुढीलप्रमाणे करावे.

१)शासनाने जाहीर केलेल्या सर्व सार्वजनिक सुट्टयांचे दिवशी कला महाविद्यालये बंद ठेवण्यात यावीत.

२)याशिवाय उपरोक्त बंधन पाळून शासनमान्य अशासकीय कला संस्थांच्या प्रमुखांना दोन्ही सत्र मिळून एकूण ३ दिवसांची स्थानिक सुट्टी "कला संचालक,महाराष्ट्र राज्य, मुंबई" यांची आगाऊ मंजूरी मिळवून जाहीर करता येईल.

३)कला संस्थांतील शिक्षक वर्गाने सत्रारंभाच्या तारखेपासून संस्थेत उपस्थित राहणे आवश्यक आहे. मात्र सत्रारंभापूर्वी शैक्षणिक स्वरुपाच्या प्राथमिक कामासाठी तसेच सत्रसमाप्ती नंतरच्या शैक्षणिक स्वरुपाच्या उर्वरित कामासाठी आवश्यकतेनुसार संस्था प्रमुखांनी शिक्षक वर्गाला संस्थेत बोलाविल्यास त्यांनी उपस्थित रहावे. शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ साठी विहित केलेले कामाचे एकूण दिवस वरीलप्रमाणे निश्चित केलेले आहेत.

४)विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित कला संस्थांच्या बाबतीत शैक्षणिक शुल्क व इतर शुल्क शासन निर्णय क्र.एडीआर-२०११/प्र.क्र.१५२/तांशि-६, दि.२७ फेब्रुवारी, २०१७ अन्वये निश्चित करण्यात आले आहे. त्याप्रमाणे शुल्क प्रत्येक विद्यार्थ्यांकडून आकारणे बंधनकारक राहील.

३. शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ मधील विद्यार्थी प्रवेशासंबंधीची माहिती/कार्यवाही खालीलप्रमाणे राहील.

शासन पत्र क्र. एडीआर-२०२१/प्र.क्र.५७/तांशि-६, दि.१२.०८.२०२१ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय, शासनमान्य अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित संस्थेतील मुलभूत, प्रथम वर्ष (अंतर्गत गृहसजावट, वस्त्रकाम, मातकाम, धातूकाम), कला शिक्षक प्रशिक्षण (नवीन अभ्यासक्रम), एलिमेंटरी-रेखाकला व रंगकला, एलिमेंटरी-उपयोजित कला, एलिमेंटरी-शिल्पकला, आर्ट मास्टर(अंशकालीन वर्ग), डिप.ए.एड. अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी अंतिम यादी तयार करण्याची कार्यवाही कला संचालनालय व निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे स्तरावर केंद्रीय पद्धतीने ऑनलाईन स्वरुपात करण्यात येईल. याबाबतचे वेळापत्रक www.doa.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर लवकरच प्रसिध्द करण्यात येईल. त्यानुषंगाने कला संस्थांनी योग्य ती कार्यवाही करावी.

४. कला शाखेतील द्वितीय (इंटरमिजिएट), तृतीय (ॲडव्हान्स) आणि पदविका (डिप्लोमा), आर्ट मास्टर (सुट्टीतील/अंशकालीन) अभ्यासक्रमासाठी विहित नियम:-

१) आपल्या संस्थेतून एलिमेंटरी व ॲडव्हान्स - रेखाकला व रंगकला, उपयोजित कला, शिल्पकला व प्रतिमानबंध वर्गात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे इंटरमिजिएट व डिप्लोमाच्या वर्गात तसेच आर्ट अँड क्राफ्ट प्रथम वर्ष उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना व्दितीय वर्षात त्यांचेकडून शुल्क स्विकारुन प्रवेश देण्याची कार्यवाही करावी. प्रवेशाच्या अंतिम तारखेबाबतची लेखी सूचना निकालपत्राबरोबर विद्यार्थ्यांना पाठविण्यात यावी. इंटरमिजिएट (रेखाकला व रंगकला, उपयोजित कला, शिल्पकला व प्रतिमानबंध) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी इंटरमिजिएट परीक्षेचा निकाल जाहीर झाल्याच्या तारखेपासून ८ दिवसाच्या आत ॲडव्हान्स वर्गात प्रवेश घ्यावा असे विद्यार्थ्यांना कळवावे.

२) आपल्या संस्थेमध्ये इंटरमिजिएट, ॲडव्हान्स व डिप्लोमा या वर्गात बदलीने प्रवेश घेण्यासाठी इतर संस्थेतील विद्यार्थ्यांकडून/संस्थांमार्फत काही अर्ज आले असल्यास विद्यार्थी पूर्वीच्या संस्थेत कोणत्याही परिस्थितीत प्रवेश घेऊ शकत नाहीत याबाबतचे विद्यार्थ्यांचे लेखी निवेदनासह पूर्वीच्या संस्थेकडून ना-हरकत प्रमाणपत्र किंवा महाविद्यालय सोडल्याचा दाखला तसेच बदली प्रवेशासंबंधीची इतर आवश्यक

कागदपत्रांची पुर्तता करुन घेऊन अशी बदली प्रकरणे संस्थेच्या स्तरावर निकाली काढावीत. कोणत्याही परिस्थितीत या संचालनालयाकडे अशी बदली प्रकरणे पाठविण्यात येऊ नयेत. अशा बदली प्रकरणांबाबत या कार्यालयाकडून कोणतीही दखल घेतली जाणार नाही. बदली प्रवेशासंबंधीची कार्यवाही संबंधित अभ्यासक्रम वर्गाची प्रवेश प्रक्रिया चालू झाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांचे कालावधीतच करण्यात यावी. एक महिन्याच्या कालावधीनंतर कोणत्याही परिस्थितीत बदली प्रवेशासंबंधीची कार्यवाही करु नये. बदली प्रवेश हे प्रचलित प्रवेश नियम व गुणवत्तेनुसारच देण्यात यावेत. कोणत्याही परिस्थितीत प्रचलित प्रवेश नियमांचे उल्लंघन होणार नाही, याची काटेकोरपणे दक्षता घ्यावी. अन्यथा उद्भवणा-या परिस्थितीस संबंधित संस्था/प्राचार्य यांना जबाबदार धरण्यात येईल.

<u>विशेष सूचना</u> :-

अ) शालांत परीक्षेचे/शासकीय कला परीक्षेचे निकाल उशीरा जाहीर झाल्यास काही अभ्यासक्रमाचे वर्ग उशीरा सुरु होतील. त्यामुळे २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठी विहित केलेले एकूण कामाचे दिवस व अभ्यासक्रमास मिळणारे एकूण कामाचे दिवस यात पडणारी तूट संस्थांनी संबंधित वर्ग सुट्टीच्या दिवशी काम करुन भरुन काढणे आवश्यक आहे. तसेच कोणत्याही परिस्थितीत अभ्यासक्रमाचे एकूण कामाचे दिवस १९२ पेक्षा कमी भरणार नाहीत याची संस्था प्रमुखांनी खबरदारी घ्यावी. वर्ग उशीरा सुरु केल्यानंतर मिळणारे एकूण प्रत्यक्ष कामाचे दिवस व विहित केलेले एकूण दिवस यात पडणारी तूट संस्था कशी भरुन काढणार आहे याबाबतची माहिती संबंधित वर्ग सुरु झाल्यानंतर एक महिन्याचे आत निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर करण्यात येऊन त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

तसेच फक्त बदली होऊन आलेल्या राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या अधिकारी/कर्मचारी यांच्या मुलांना/पाल्यांना प्रवेश मिळण्याबाबतची प्रकरणे खास बाब म्हणून प्रवेशास मान्यता मिळण्याकरिता निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर करावीत. कला संस्थांनी अशी प्रकरणे स्वत:च्या अधिकारात निकाली काढू नयेत.

ब) नियमबाहय किंवा प्रवेश मर्यादेबाहेर विद्यार्थ्यांना प्रवेश दिले गेल्यास संबंधित संस्थेवर शासन निर्णय क्र.एनजीसी-२००५/(८२१/०५)मशि-३, दि.२२ जानेवारी, २००७ नुसार खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

१) संस्थेने अभ्यासक्रम/विषय/तुकडया शासनाच्या मान्यतेशिवाय परस्पर सुरु केल्यास किंवा अभ्यासक्रम/विषय/तुकडया यातील मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यास, अशा अनधिकृतपणे प्रवेशित प्रत्येक विद्यार्थ्यामागे संस्थेस त्याने भरणा केलेल्या शिक्षण शुल्काच्या २००% दंड आकारण्यात येईल.

२) संस्थेने वरीलप्रमाणे पुन्हा पुनरावृत्ती केल्यास संस्थेला, अनधिकृतपणे प्रवेशित प्रत्येक विद्यार्थ्यामागे शिक्षण शुल्काच्या ५००% दंड आकारण्यात येईल.

३) त्यानंतरही संस्थेने वरीलप्रमाणे पुनरावृत्ती केल्यास संबंधित संस्थेची मान्यता रद्द करण्यासारखी शिक्षा संस्थेस करण्यात येईल किंवा शिखर संस्थेकडे मान्यता रद्द करण्यासाठी शिफारस करण्यात येईल.

४) दंडाची रक्कम कुठल्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांकडून वसूल न करता संस्थेकडून वसूल करण्यात येईल.

क) अनुदान संहितेतील नियमानुसार संस्थेने विद्यार्थी अथवा पालक यांच्याकडून कोणताही लाभ मिळण्याच्या दृष्टीने शर्त म्हणून रोख किंवा कोणत्याही स्वरुपात निधी स्विकारु नये. त्याचप्रमाणे या संबंधात कार्यालयाचे परिपत्रक क्र. पीआय-१०८९/दोन/५२६९, दि. १० मार्च १९८९ अन्वये कळविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाचे शिक्षण व सेवायोजन विभागाचे क्र.डिओअे-१०८८/(२१०००८) /साशि-५, दि. ५ मे, १९८८ च्या महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम १९८७ नुसार कॅपिटेशन फी, देणग्या इत्यादी घेण्यास प्रतिबंध केला आहे. असे असूनही काही संस्थांनी यापूर्वी विद्यार्थी/पालक यांचेकडून देणग्या वसूल केल्या आहेत असे आढळून आले आहे. अशा संस्थांच्या बाबतीत योग्य ती कार्यवाही करणे अथवा अनुदानाच्या रकमेत कपात करणे या कार्यालयास भाग पडेल. यापुढे अशाप्रकारे देणग्या घेण्यात आल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित संस्थांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल.

ड) उपरोक्त बाबींचा विचार करता देणग्यांबाबत शासकीय आदेशाचे पालन काटेकोरपणे करण्याच्या दृष्टीकोनातून विद्यार्थ्यांकडून प्रवेशासाठी कोणत्याही स्वरुपात संस्था देणग्या स्विकारत नाहीत हे सर्वांना कळावे

म्हणून या कार्यालयाने पूर्वी सूचना दिल्याप्रमाणे संस्थेच्या दर्शनी भागात खालील मजकूराचा ठळक अक्षरात कायमस्वरुपी फलक त्वरित लावण्यात यावा.

<u>" या संस्थेत विद्यार्थी अथवा पालकांकडून प्रवेशासाठी कोणत्याही स्वरुपात निधी स्विकारला जात नाही"</u>

इ) संस्थांच्या आकस्मिक तपासणी भेटीत विद्यार्थ्यांची हजेरीपटाची पाहणी केली असता हजेरीपट वेळोवेळी दिलेल्या सूचनांनुसार ठेवण्यात न आल्याचे आढळून आले आहे. हजेरीपट रोजच्या रोज (दैनंदिन) विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घेऊन भरण्यात यावेत असे यापूर्वीच कळविण्यात आले आहे. तरीही काही संस्था विद्यार्थ्यांच्या नांवासमोर "पी.पी." असे लिहून शिक्षकच हजेरी भरुन घेतात व महिना अखेरीस त्याबाबतीत विद्यार्थ्यांची फक्त एकदाच सही घेतली जाते असे निदर्शनास आले आहे. सदर पद्धत पूर्णपणे चूकीची असून यापुढे विद्यार्थ्यांच्या हजेरीचे स्वतंत्र " स्वाक्षरी रजिस्टर " हजेरी नोंद म्हणून तयार करण्यात येऊन त्यात रोजचे रोज विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घेण्यात यावी. जेव्हा विद्यार्थी गैरहजर असेल तेव्हा त्या त्या वेळी त्यांच्या नांवासमोर लाल शाईने " अनुपस्थित " किंवा x (क्रॉस) असे करण्यात येऊन उपस्थिती क्रमांकाला वर्तुळ करण्यात यावे. याची काटेकोरपणे संस्थांनी अंमलबजावणी करावयाची आहे.विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताच्या दृष्टीकोनातून प्रत्येक विद्यार्थ्याला आपल्या वर्गातील हजेरीचे दिवस किती भरुन झाले आहेत हे वेळोवेळी माहिती असणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा त्या माहिती अभावी विद्यार्थी महाविद्यालयात निष्काळजीपणाने हजर न राहिल्याने तो परीक्षेला बसण्यास अपात्र ठरतो. त्यामुळे त्याचे आयुष्यातील एक वर्ष वाया जाते. याकरिता संस्थेतील संबंधित वर्गशिक्षकाने प्रत्येक महिन्या अखेरीस विद्यार्थ्याचे किती दिवस भरले आहेत हे विद्यार्थ्यांना पुढील महिन्याच्या ३ तारखे पर्यंत दाखवून हजेरी माहित झाल्याबाबत विद्यार्थ्यांची स्वाक्षरी हजेरीपटावर घ्यावी. याकरिता हजेरी पटावरील स्वाक्षरीसाठी एक रकाना वाढविण्यात यावा. ही पद्धत प्रत्येक संस्थेने अत्यंत काटेकोरपणे पाळावयाची आहे.

फ) प्रवेश नियमांची व अटींची पूर्तता पूर्ण न करु शकणारे विद्यार्थी तसेच प्रवेश मर्यादेमुळे प्रवेश मिळू न शकलेले विद्यार्थी अशांना प्राचार्य परस्पर कला संचालकांकडे पाठवितात हे अनुचित असून यापुढे अशी प्रकरणे कला संचालकांकडे पाठविण्यात येऊ नयेत. प्राचार्यांनीच संबंधित विद्यार्थ्यांना योग्य ते मार्गदर्शन करावे.

५. चालू वर्षाची (२०२२-२३) विद्यार्थी/विद्यार्थीनींबाबतीतील माहिती सोबतच्या विहित तक्त्यात (तक्ता क्र.१) भरुन निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर तात्काळ पाठविण्यात यावी व तपासणीअंती मान्य केलेल्या यादीची प्रमाणित प्रत निरीक्षक कार्यालयाने या संचालनालयास सादर करावी. सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात आपल्या कला महाविद्यालयात प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांचे प्रथम वर्ष-मुलभूत अभ्यासक्रम, प्रथम वर्ष-कला शिक्षक प्रशिक्षण, प्रथम वर्ष-रेखाकला व रंगकला, प्रथम वर्ष-उपयोजित कला, प्रथम वर्ष-वस्त्रकला, प्रथम वर्ष-इंटेरिअर डेकोरेशन/आर्ट मास्टर प्रमाणपत्र, प्रथम वर्ष-सिरॅमिक्स व पॉटरी, प्रथम वर्ष-शिल्पकला व प्रतिमानबंध, डिप.ए.एड. इत्यादीचे मूळ प्रवेश अर्ज व प्रवेशासाठी सादर केलेली मूळ कागदपत्रे/प्रमाणपत्रे, शैक्षणिक अर्हता व आपल्या कला संस्थेत प्रवेश घेण्यापूर्वी शिकत असलेल्या शाळा सोडल्याचा दाखला, शासकीय रेखाकला (इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र, आर्ट मास्टर प्रमाणपत्र अभ्यासक्रमाना प्रवेश घेतलेल्या शिक्षकांचे अनुभवाचे प्रमाणपत्र, सक्षम अधिका-यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र इत्यादी मूळ प्रमाणपत्रे घेऊन <u>ऑगस्ट अखेर पर्यंत निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे सूचनेनुसार पडताळणी करुन घ्यावयाची आहे. अन्यथा सदर संस्थांमधून दिलेले प्रवेश रद्द करणेबाबत कार्यवाही करण्यात येईल.</u> तसेच विनाअनुदानित कला संस्थेतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांचे नियुक्ती आदेश प्रवेश तपासणीच्या वेळी समक्ष सादर करावेत. प्रवेश निश्चितीच्या वेळी सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे (तक्ता क्र.१,२,३,४) माहिती सादर करणे सर्व संस्थांना बंधनकारक आहे. तरच प्रवेश प्रक्रियेस/निश्चितीस मान्यता देण्यात येईल. तसेच तक्ता क्र.३ मध्ये दर्शविल्यानुसार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या आकृतीबंधास व नियुक्तीस महाविद्यालय सुरु करण्यापूर्वी **निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडून मान्यता घेण्यात यावी.** तसेच शासन परिपत्रक क्र.एडीआर-१४०५/(२१२/०५)/साशि-५, दि.१५ मे,२००६ अन्वये कला संस्थांचे वित्तीय स्थैर्य आश्वासित असणे या अटीची पूर्तता करणे सर्व संस्थांवर बंधनकारक आहे. वित्तीय स्थैर्याची अटीची पूर्तता केली किंवा कसे याबाबतची पडताळणी निरीक्षक, चित्रकला व शिल्प यांचेकडून करण्यात येईल.

कला संचालनालयाने ठरविल्याप्रमाणे या वर्षी आपण दिलेल्या प्रवेशाप्रमाणे सादर केलेल्या मूळ कागदपत्रांची पडताळणी होऊन कला संचालनालयाने दिलेल्या प्रवेश मर्यादेच्या अधीन राहून प्रवेश दिलेले

विद्यार्थीच परीक्षेस प्रविष्ट होण्यास पात्र असतील व परस्पर प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांस कोणत्याही परिस्थितीत परीक्षेस बसता येणार नाही, याची नोंद घ्यावी व वर्ष अखेरीस त्यापैकी जे विद्यार्थी विहित हजेरी व वर्गकामाची पूर्तता करणार नाहीत त्यांची नांवे परीक्षेतून वगळण्यासाठी (Withdrawal) कळविण्याची जबाबदारी प्राचार्यांची राहील. <u>निर्धारित तारखेस आपण आपल्या कला महाविद्यालयात प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या, मूळ प्रवेश अर्ज व अर्जासोबतची मूळ प्रमाणपत्र निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर न केल्यास आपल्या संस्थेत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये प्रवेश प्रक्रियेबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नाही असे गृहीत धरण्यात येईल.</u>

६. विद्यार्थ्यांच्या वर्गकामानिमित्ताने लागणारी असाईनमेंट कार्ड कला संस्थांनी छापून घ्यावयाची आहेत.

७. तपासणी अधिका-यांच्या तीन आकस्मिक भेटीत विद्यार्थ्यांची अनुपस्थिती आढळून आल्यास महाविद्यालय/अभ्यासक्रम बंद करण्याबाबत शासनास शिफारस करण्यात येईल,याची नोंद घेण्यात यावी.

८. संस्थांच्या आकस्मिक भेटीत तपासणी अधिका-यांनी विद्यार्थ्यांच्या वर्गकामाचा पोर्टफोलिओ मागितला असता पोर्टफोलिओ वर्गात नसल्याचे आढळून आले आहे.सदर पोर्टफोलिओ विद्यार्थी घरी घेऊन गेल्याचे सांगण्यात येते.तरी विद्यार्थ्यांचे वर्गकाम घरी घेऊन जाण्यास बंदी करावी व सर्व वर्गकाम वर्गात ठेवावे.

९. कृपया या परिपत्रकाची पोच द्यावी. त्याचप्रमाणे परिपत्रकातील माहिती सर्व विद्यार्थ्यांच्या तसेच शिक्षक वर्गाच्या निदर्शनास आणण्यात यावी.

१०. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची पदविका अभ्यासक्रमासाठी मान्यता घेण्याबाबत आपल्या स्तरावरुन योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

(राजीव मिश्रा)
कला संचालक,
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई.

प्रत,

१)निरीक्षक, चित्रकला व शिल्प,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
२)परीक्षा नियंत्रक,कला संचालनालय,म.राज्य,मुंबई यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३)सहायक निरीक्षक,चित्रकला व शिल्प विभागीय कार्यालय,नागपूर/औरंगाबाद यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना
४)कार्यासन क्रमांक- तीन/पांच यांना माहितीसाठी अग्रेषित.

प्रत, माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१) अधिष्ठाता, सर ज.जी.कला महाविद्यालय, मुंबई.
२) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर.
३) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, औरंगाबाद.

त्यांना कळविण्यात येते की, त्यांच्या संस्थेतील पदवी अभ्यासक्रमासाठी संबंधित विद्यार्थ्यांना ठरविलेली सत्रारंभाची तारीख व कार्यालयाने पदविका अभ्यासक्रमासाठी ठरविलेल्या वरील तारखा लक्षात घेऊन त्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ च्या सत्रारंभाची तारीख ठरवावी. तसेच विद्यापीठाने निर्धारित केलेल्या दिवाळी सुट्टी इत्यादी लक्षात घेऊन आपल्या संस्थेच्या दीर्घसुट्टया, कामाचे दिवस पुर्ण भरतील अशारीतीने ठरवाव्यात व तशा सूचना विद्यार्थ्यांना द्याव्यात.तसेच पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश देण्याबाबतची कार्यवाही विहित केल्याप्रमाणे करावी. याबाबत केलेली कार्यवाही कृपया या कार्यालयास कळवावी.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील महिनानिहाय शैक्षणिक कामाचे दिवस दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | महिना | दिवस |
|---|---|---|
| प्रथम सत्र | | |
| १ | जून,२०२२ (दि.१३ ते ३० जून,२०२२) | १३ |
| २ | जुलै, २०२२ | २१ |
| ३ | ऑगस्ट, २०२२ | १९ |
| ४ | सप्टेंबर, २०२२ | २२ |
| ५ | ऑक्टोबर, २०२२ | १४ |
| | **एकूण-अ** | ८९ |
| दि.२४ ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर,२०२२ पर्यंत दिवाळी सुट्टी | | |
| द्वितीय सत्र | | |
| ६ | नोव्हेंबर,२०२२ | १६ |
| ७ | डिसेंबर,२०२२ | २२ |
| ८ | जानेवारी,२०२३ | २२ |
| ९ | फेब्रुवारी,२०२३ | २० |
| १० | मार्च,२०२३ | २३ |
| | **एकूण-ब** | **१०३** |
| | **एकूण-अ+ब** | **१९२** |
| | एप्रिल,२०२२ | १८ |
| | एकूण-क | १८ |
| | **एकूण- अ+ब+क** | **२१०** |

RNI No. MAHBIL /2009/31745

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-मध्य उप-विभाग

वर्ष ७, अंक ४८]     गुरुवार, डिसेंबर २, २०२१/अग्रहायण ११, शके १९४३     [पृष्ठे ६, किंमत : रुपये ४.००

### असाधारण क्रमांक ७३

### प्राधिकृत प्रकाशन

### सामान्य प्रशासन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २ डिसेंबर २०२१

### सार्वजनिक सुट्ट्या-२०२२

### अधिसूचना

क्रमांक सार्वसु. ११२१/प्र.क्र. ९७/कार्या-२९.— भारत सरकारच्या गृह मंत्रालयाची अधिसूचना क्रमांक ३९/१/६८, जेयुडीएल/तीन, दिनांक ८ मे १९६८ अन्वये महाराष्ट्र शासनास सोपविण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून, महाराष्ट्र शासन या अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र राज्यात सन २०२२ सालासाठी खाली नमूद केलेल्या दिवशी सार्वजनिक सुट्ट्या म्हणून जाहीर करीत आहे :—

**(अ) सार्वजनिक सुट्ट्या**

| अ. क्र. (१) | सुट्टीचा दिवस (२) | इंग्रजी तारीख (३) | भारतीय सौर दिनांक (४) | वार (५) |
|---|---|---|---|---|
| १ | प्रजासत्ताक दिन | २६ जानेवारी, २०२२ | ६ माघ, शके १९४३ | बुधवार |
| २ | महाशिवरात्री | १ मार्च, २०२२ | १० फाल्गुन, शके १९४३ | मंगळवार |
| ३ | होळी (दुसरा दिवस) | १८ मार्च, २०२२ | २७ फाल्गुन, शके १९४३ | शुक्रवार |
| ४ | महावीर जयंती | १४ एप्रिल, २०२२ | २४ चैत्र, शके १९४४ | गुरुवार |
| ५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती | १४ एप्रिल, २०२२ | २४ चैत्र, शके १९४४ | गुरुवार |
| ६ | गुड फ्रायडे | १५ एप्रिल, २०२२ | २५ चैत्र, शके १९४४ | शुक्रवार |
| ७ | रमझान ईद (ईद-उल-फितर) (शव्वल-१) | ३ मे, २०२२ | १३ वैशाख, शके १९४४ | मंगळवार |
| ८ | बुद्ध पौर्णिमा | १६ मे, २०२२ | २६ वैशाख, शके १९४४ | सोमवार |
| ९ | मोहरम | ९ ऑगस्ट, २०२२ | १८ श्रावण, शके १९४४ | मंगळवार |
| १० | स्वातंत्र्य दिन | १५ ऑगस्ट, २०२२ | २४ श्रावण शके १९४४ | सोमवार |





७

(अ) सार्वजनिक सुट्ट्या—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ११ | पारशी नववर्ष दिन (शहेनशाही) | १६ ऑगस्ट, २०२२ | २५ श्रावण, शके १९४४ | मंगळवार |
| १२ | गणेश चतुर्थी | ३१ ऑगस्ट, २०२२ | ९ भाद्रपद, शके १९४४ | बुधवार |
| १३ | दसरा | ५ ऑक्टोबर, २०२२ | १३ आश्विन, शके १९४४ | बुधवार |
| १४ | दिवाळी अमावस्या (लक्ष्मीपूजन) | २४ ऑक्टोबर, २०२२ | २ कार्तिक, शके १९४४ | सोमवार |
| १५ | दिवाळी (बलिप्रतिपदा) | २६ ऑक्टोबर, २०२२ | ४ कार्तिक, शके १९४४ | बुधवार |
| १६ | गुरुनानक जयंती | ८ नोव्हेंबर, २०२२ | १७ कार्तिक, शके १९४४ | मंगळवार |

(ब) बँकांसाठी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | बँकांना आपले वार्षिक लेखे पूर्ण करता येण्यासाठी. | १ एप्रिल २०२२ | ११ चैत्र, शके १९४४ | शुक्रवार |

उपरोक्त सुट्टी बँकांसाठी मर्यादित आहे. सदरहू सुट्टी शासकीय कार्यालयांसाठी लागू नाही.

(क) खालील सुट्ट्या शनिवारी व रविवारी येतात

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | छत्रपती शिवाजी महाराज जयंती | १९ फेब्रुवारी, २०२२ | ३० माघ, शके १९४३ | शनिवार |
| २ | गुढीपाडवा | २ एप्रिल, २०२२ | १२ चैत्र, शके १९४४ | शनिवार |
| ३ | रामनवमी | १० एप्रिल, २०२२ | २० चैत्र, शके १९४४ | रविवार |
| ४ | महाराष्ट्र दिन | १ मे, २०२२ | ११ वैशाख, शके १९४४ | रविवार |
| ५ | बकरी ईद (ईद-उल-झुआ) | १० जुलै, २०२२ | १९ आषाढ, शके १९४४ | रविवार |
| ६ | महात्मा गांधी जयंती | २ ऑक्टोबर, २०२२ | १० आश्विन, शके १९४४ | रविवार |
| ७ | ईद-ए-मिलाद | ९ ऑक्टोबर, २०२२ | १७ आश्विन, शके १९४४ | रविवार |
| ८ | ख्रिसमस | २५ डिसेंबर, २०२२ | ४ पौष, शके १९४४ | रविवार |

उपरोक्त **(अ)** येथील सुट्ट्यांना परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ (सन १८८१ चा अधिनियम २६) कलम २५ करिता सार्वजनिक सुट्ट्या म्हणून अधिसूचित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ज. जि. वळवी,**
शासनाचे उप सचिव.